वाचले:-

१. मा.महापालिका सभा ठराव क्र.१४७, दि.२८/०२/२०१८
२. मा.महापालिका सभा ठराव क्र.१८७, दि.२०/०४/२०१८
३. मा.आयुक्त यांचे आदेश क्र.जशुके/पापु/१९३/२०१८, दि.०७/०६/२०१८
४. मा.महापालिका सभा ठराव क्र.३०६, दि.३१/१०/२०१८
५. मा.आयुक्त यांचे धाश क्र.पापु/मुख्य/१४०/२०१८, दि.२९/११/२०१८
६. मा.महापालिका ठराव क्र.३८०, दि.२२/०२/२०१८
७. मा.आयुक्त यांचे आदेश क्र.पापु/मुख्य/७८०/२०११, दि.०७/०३/२०१९
८. मा.अति.आयुक्त यांचे आदेश क्र.पापु/४७७/२०२२, दि.०६/०७/२०२२
९. मा.अति.आयुक्त यांचे आदेश क्र.पापु/मुख्य/तां./३४/२०२३, दि.१७/०३/२०२३

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८
पाणीपुरवठा विभाग
क्र.पापु/मुख्य/तां./ ४० /२०२३
दि.३१ /०३/२०२३

विषयः- पाणीपुरवठा धोरण व पाणीपट्टी दरबदलाबाबत...

आदेश,

मा.महापालिका सभा ठराव क्र.१४७, दि.२८/०२/२०१८ तसेच मा.महापालिका सभा ठराव क्र.१८७, दि.२०/०४/२०१८ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे पाणीपट्टीचे दर टप्प्या – टप्प्याने दर वर्षी वाढविण्यास व त्यानुसार दरवर्षी अशा सर्व प्रकारच्या दरांमध्ये वार्षिक ५ टक्के दरवाढ करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे.

त्या अनुषंगाने सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी सोबतच्या परीशिष्टात दर्शविलेल्या आकारणी करणेत यावी.

सोबतः- परिशिष्ट
पानांक १ ते

सही/-
अति.आयुक्त (१)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

३१/०३

सह शहर अभियंता
पाणीपुरवठा विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८

# परिशिष्ठ

पाणीपट्टी दर (सन २०२३-२४)
(सुधारित पाणीपट्टी दर दि.०१/०४/२०२३ पासून लागू)

## दरपत्रक सन २०२३-२४

१. दर प्रति सदनिका प्रति महिना

| अ.क्र. | पाण्याचा वापर LPCD | पाण्याचा वापर प्रति माह प्रति सदनिका ( लिटर्स मध्ये) | पाणीदर ( प्रति १००० लिटर्स साठी ) प्रति माह प्रति सदनिका ( र.रु.) | |
|---|---|---|---|---|
| | | | सन २०२२-२३ | सन २०२३-२४ |
| १ | १-४० | १ - ६००० | ०.०० | ०.०० |
| २ | ४१-१५० | ६००१ - २२५०० | ४.८६ | ५.१० |
| ३ | १५१-२०० | २२५०१ - ३०००० | ९.७२ | १०.२१ |
| ४ | २०१ पेक्षा जास्त | ३०००१ पेक्षा जास्त | १४.५८ | १५.४६ |

१) वाणिज्य वापरासाठी प्रति युनिट लिटर्ससाठी सरसकट – हॉटेल्स, रेस्टारंट्स, दुकाने, इ. चे दर

| २) दर प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट ( र.रु.) | |
|---|---|
| २०२२-२३ | २०२३-२४ दर |
| ६०.७७ | ६३.८१ |

३) खाजगी शैक्षणिक संस्था, वसतिगृहे, शासकीय-निमशासकीय कार्यालये, रेल्वे स्टेशन्स, ईएसआय हॉस्पीटल, औंध ऊरो रुग्णालय.

| आर्थिक वर्ष | दर प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट |
|---|---|
| सन २०२२-२३ | र.रु.१८.२३ |
| २०२३-२४ चा दर | र.रु.१९.०५ |

४) धार्मिक स्थळे, अनाथाश्रम, वृध्दाश्रम, धर्मादाय आयुक्त यांची मान्यता असलेली ना नफा ना तोटा या तत्वावर चालविण्यात येणारी मंडळे.

| आर्थिक वर्ष | दर प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट |
|---|---|
| सन २०२२-२३ | र.रु.१२.१४ |
| २०२३-२४ चा दर | र.रु.१२.६९ |

५) स्टेडीयम (शासकीय / खाजगी)

| आर्थिक वर्ष | दर प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट |
|---|---|
| सन २०२२-२३ | र.रु.२४.३० |
| २०२३-२४ चा दर | र.रु.२५.३९ |

६) मनपा इमारती / मिळकतीं – Book Adjustment करिता

| आर्थिक वर्ष | दर प्रति १००० लिटर्ससाठी सरसकट |
|---|---|
| सन २०२२-२३ | र.रु.१२.१४ |
| २०२३-२४ चा दर | र.रु.१२.६९ |

७) **झोपडपट्टीसाठी धोरण** – झोंपडपट्टीसाठी धोरण प्रस्तावित करताना सदर ग्राहकांसाठी Cross-subsidized पध्दतीने दर राहिल.

अ) प्रस्तावित दर ( मीटर बसविलेल्या झोपडपट्टी / झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील नळजोड ग्राहकांसाठी निवासी वापरासाठी प्रति कुटुंब । सदनिका प्रति महिना)

आ) मीटर न बसविलेल्या झोपडपट्टीतील / झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील ग्राहक

| अ.क्र. | LPCD | प्रति माह प्रति सदनिका पाण्याचा वापर ( लिटर्स मध्ये) | पाणीदर ( प्रति १००० लिटर्स साठी ) सन २०२२-२३ | पाणीदर ( प्रति १००० लिटर्स साठी ) २०२३-२४ चा प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| १ | ४० | १ ते ६००० | र.रु.०.०० | ०.०० |
| २ | ४१-१०० | ६००१ ते १५००० | र.रु. २.४२ | २.५४ |
| ३ | १०१-१५० | १५००१ ते २२५०० | र.रु.३.६४ | ३.८२ |
| ४ | १५१-२०० | २२५०१ ते ३०००० | र.रु.९.७२ | १०.२१ |
| ५ | २०० च्या पुढे | ३०००१ व त्यापुढे | र.रु.१४.५८ | १५.३१ |

i) झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प ( वापर १३५ LPCD प्रमाणे )

झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील इमारतींना प्रति सदनिकाप्रमाणे मासिक बिल देण्यांत यावे..

| आर्थिक वर्ष | दर प्रति महिना प्रति सदनिका |
|---|---|
| सन २०२२-२३ | र.रु.४२.६० |
| २०२३-२४ चा दर | र.रु.४४.७३ |

सदर प्रकल्पातील इमारतीची दिनांक ३१।०३।२०१८ पर्यंतची थकबाकी र.रु.३५।– प्रति महिना याप्रमाणे पूर्वलक्षी प्रभावाने वसूल करण्यात यावी.

II) झोपडपट्टी वैयक्तिक नळजोड ( वापर ९० LPCD प्रमाणे )

झोपडपट्ट्यांमधील वैयक्तिक नळजोडाची पाणीबिले वार्षिक पध्दतीने देण्यात यावीत.

| आर्थिक वर्ष | दर प्रति वर्ष प्रति वैयक्तिक नळजोड |
|---|---|
| सन २०२२-२३ | र.रु.२१९.०० |
| **२०२३-२४ चा प्रस्तावित दर** | र.रु.२३०.०० |

दिनांक ३१।०३।२०१८ पर्यंतची थकबाकी र.रु.१८०।– प्रति वर्ष या दराने पूर्वलक्षी प्रभावाने वसूल करण्यात यावी.

III) झोपडपट्टीतील गट नळजोड ( Group Connection)

१५ मिमी व्यास - ५ कुटुंबे ( वापर ७० LPCD प्रमाणे )

| आर्थिक वर्ष | दर प्रति वर्ष प्रति वैयक्तिक नळजोड |
|---|---|
| सन २०२२-२३ | र.रु.२१९.०० |
| **२०२३-२४ चा प्रस्तावित दर** | र.रु.२३०.०० |

झोपडपट्ट्यांमधील गट नळजोडाची ( Group Connection) पाणी बिले वार्षिक पध्दतीने देण्यात यावीत. तसेच दिनांक ३१।०३।२०१८ पर्यंतची थकबाकी सन २०१८-१९ च्या दराने पूर्वलक्षी प्रभावाने वसूल करण्यात यावी. झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील व झोपडपट्ट्यांमधील नळजोडांच्या थकबाकीवर दिनांक ३१।०३।२०१८ पर्यंत कोणताही दंड आकारु नये.

**८) अनधिकृत नळ कनेक्शनबाबत धोरण** - अनधिकृत नळजोड नियमित करण्याबाबतचे स्वतंत्रपणे जाहीर करणेत येईल.

**९) रिकनेक्शनबाबत धोरणः-** पाणीपट्टी न भरल्याने, पाणी गळतीमुळे अथवा अन्य कारणास्तव नळ कनेश्कन तात्पुरते बंद करण्यात आलेले असल्यास, ज्या कारणासाठी कनेक्शन बंद करण्यात आलेले आहे त्याची पुर्तता / निवारण झाल्यानंतर रिकनेक्शन करण्याचे अधिकार पाण्याचे नवीन नळ कनेक्शन मंजूर करण्याच्या अधिकाराच्या पध्दतीप्रमाणेच संबंधित उपअभियंता / कार्यकारी अभियंता यांना राहतील. संबंधित ग्राहकाने रिकनेक्शनसाठीची आवश्यक ती पुर्तता केल्यानंतर दोन दिवसाचे आत पाणीपुरवठा विभागाने रिकनेक्शनची कार्यवाही पुर्ण करावी. तसेच जर महापालिकेने पाईपलाईन बदलल्याने रिकनेक्शन करावयाचे झाल्यास त्यासाठी ग्राहकांकडून शुल्काची आकारणी करू नये. तथापि, रिकुनेक्शनसाठी लागणारे साहित्य ग्राहकाने आणून देणे गरजेचे आहे.

१०) अनामत रक्कमः-

नवीन नळ कनेक्शनसाठी झोपडपट्टीतील ग्राहक वगळता इतर सर्व ग्रहकांसाठी खालीलप्रमाणे अनामत रकमेची आकारणी करावी.

| अ.क्र. | नळजोड व्यास | मीटर किमती शिवाय घ्यावयाची अनामत रक्कम | |
|---|---|---|---|
| | | निवासी पाणीवापर र.रू. | बिगर निवासी पाणीवापर र.रू. |
| १ | १५ मि.मी. | २,०००/- | ८,०००/- |
| २ | २० मि.मी. | ३,५००/- | १५,०००/- |
| ३ | २५ मि.मी. | १०,०००/- | २०,०००/- |
| ४ | ४० मि.मी. | २०,०००/- | २५,०००/- |
| ५ | ५० मि.मी. | २५,०००/- | ३०,०००/- |
| ६ | ८० मि.मी. | ८८,०००/- | १,१४,०००/- |
| ७ | १०० मि.मी. | १,८७,०००/- | २,४५,०००/- |
| ८ | १५० मि.मी. | ५,७४,०००/- | ७,७४,०००/- |

एखाद्या ग्राहकाने पाणीपट्टी देयक न भरल्यास पुर्वीप्रमाणेच वार्षिक १०% दंडाची आकारणी यापुढेही चालू राहील. तसेच एखाद्या ग्राहकाचा मीटर नादुरूस्त झाल्यामुळे किंवा अन्य कारणामुळे बदलला तर अशा ग्राहकांना पुढील मीटर रिडींगनुसार थकित कालावधीचे सरासरी बिल देण्याचे धोरण यापुढेही चालू राहील.

सदर धोरणाच्या अर्थनिष्पत्तीबाबत (Interpretation) अथवा अन्य कोणताही प्रासंगिक वाद उध्दभवल्यास त्यासंबंधी निर्णय घेण्याचा अधिकार मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना राहील.

पाण्याचे वाढीव दर टप्प्या-टप्प्याने दरवर्षी वाढविणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने दरवर्षी प्रस्तूत विषयपत्रातील अ.क्र. १ ते ८ मधील सर्व प्रकारच्या आकारमानात्मक दरांमध्ये ( Volumetric Tariff ) शासनाच्या त्या-त्या वर्षाच्या महागाई निर्देशांकाच्या प्रमाणात वार्षिक वाढ राहिल. सदरची वाढ नजिकच्या दशांकामध्ये (Round Off) करण्यांत यावी.

सही/-
अति.आयुक्त (१)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे - १८

सह शहर अभियंता
पाणीपुरवठा विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८